ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT

Golden Research Thoughts

कथात्मक साहित्यातील राजकीय जीवन

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)



प्रास्ताविक :

मानवी समाजात राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक घटकांगांना अत्यंतिक महत्व आहे. लोकशाही स्वीकारलेल्या आपल्या देशात राजकीय जाणीव - जागृती वर्षानुवर्षापासून होत आलेली आहे. सामान्य भारतीय माणूसही या राजकीय जीवनाला अंगीकारुन आपले जीवन व्यथित करताना दिसतो. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात राजकीय जाणीव जागृती करण्याचे कार्य अखंडपणे प्रवाही असल्याचे दिसून येते. लोकहीतवादी न्यायमूर्ती राजनडे, लोकमान्य टिळक, यांनी राजकीय जागरुकता दाखवून परकीय राजवटीबद्दल तत्कालीन समाज मनात चीड निर्माण केली. सरकारला वास्तविक परिस्थिमीचे भान देऊन सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? असे प्रश्न विचारुन असंतोषाचे वारे पेटवले ; तर मा. जोतीबा फुले, आगरकर यांनी मनामनात बुध्दीवादी ज्योत पेटवली. 'केसरी', 'दर्पण', 'सुधारक','विविध ज्ञानविस्तार' यासारख्या वृत्तपत्रांनी राजकीय सामाजिक जागर सुरु ठेवला.

सामाजिक प्रगतीच्या उद्दीष्टाने महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेकांनी स्वत:ला झोकून दिले. राजकीय सत्ता उपभोग मानवी कल्याणाच्या महत्तम उद्दीष्टापर्यंत पोहचता येते. हा विश्वास कालांतराने क्षीण होत गेला. त्यामुळे राजकारण आणि त्याच्यातील परिवर्तन क्षमता प्रमाणात लोप पावत गेली. शिक्षणाने जागृत झालेला समाज सुसंस्कृत माणसाचे जगणे जगू लागला.महाराष्ट्रात प्रारंभीच्या काळात रयत, शिवाजी शिक्षण संस्थेच्या रुपाने सर्वच क्षेत्रात जाणीवेची कर्ती माणसे राज्याला लाभली. त्यांनी राजकारण, समाजकारण, उद्योग, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रात ग्रामीण स्तरापर्यंत नेतृत्व केले. सामान्य माणसांपर्यंत पोहचलेले राजकारण सामान्य माणसाला बाजूला सारुन राजकीय वर्चस्व गाजविणाऱ्या माणसाचे अधि केंद्र बनले.

राजकीय जीवना

महानगरातला, शहरातला मराठी मध्यमवर्ग तर राजकारणातून दूर राहण्यातच धन्यता माणनू लागला. गांधीजींच्या हत्येने महाराष्ट्राच्या राजकारणात अकारण उच्चवर्गीय, मध्यमवर्गाकडे अविश्वासाने पाहिले जाऊ लागले. परिणामी मध्यमवर्ग राजकारणापासून अलिप्त होऊन नोकरी करण्यात धन्यता मानू लागला.या लोकांच्या राजकीय जीवनाशी परिचय होऊ लागला तो केवळ वर्तमानपत्रातूनच. त्यातील काहींनी या राजकीय जीवनाला आपल्या लेखनीचा विषय बनवून महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाला साहित्यातून अविष्कृत करण्यास प्रारंभ केला. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतूनही भिन्न भिन्न काळातील राजकीय जीवनाचे विविधांगी आणि प्रत्ययकारी चित्रण रेखाटले गेल्याचे पहावयास मिळते. अशा पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकृतीतून साकारलेल्या राजकीय जीवनाचा विस्तृत आणि विवेचक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

विष्णू सखाराम खांडेकर हे नाव मराठी साहित्याच्या परिघात लोकप्रियतेच्या सर्वोच्च

पातळीस सार्थ ठरलेले आहे. वि.स. खांडेकरांनी आपल्या 'ययाति' कादंबरीतून पौराणिक जीवनावर अतिशय प्रभावीपणे भाष्य केले आहे. खांडेकरांनी पौराणिक जीवन संदर्भाच्या रुपाने वर्तमान मानवी समाजातील वेगवेगळया वृत्ती-प्रवृत्तीचे प्रभावी आणि प्रत्ययकारी चित्रण केले आहे. ययाति या राजाच्या जीवनाला अभिव्यक्त करतानाच खांडेकरांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय जीवनाला आधोरेखित केले आहे. खांडेकरांनी या कादंबरीतून जीवनविषयक तत्वज्ञान मांडले आहे. भोवतालच्या जीवनाशी एकरुप होऊन खांडेकरांनी नेहमी विचार केलेला दिसून येतो. खांडेकरांनी भोवतालचे जीवन साकारताना या जीवनावर परिणाम करणाऱ्या घटना आणि घडामोडी मानवी समाज जीवनावर कशा आघात करतात ते सांगितले आहे. खांडेकरांच्या व्यक्तित्वावर नाही म्हटले तरी गांधीवादी विचारसरणाचा काही प्रमाणत का होईना प्रभाव पडलेला होता. खांडेकरांच्या 'ययाति' मध्ये राजकीय जीवनाचे काही पडसाद उमटलेले दिसतात या राजकीय जीवनाला खांडेकरांनी मानवी समाजातील आशा-आकांक्षा, प्रेरणा, लहरी, राग द्वेष या विविधांगी स्वरुपात अविष्कृत केले आहे. राजकीय परिस्थितीचे चित्रण कादंबरीतून कशा पध्दतीने होते याविषयी डॉ,चंद्रकांत बांदिवडेकर अतिशय नेमकेपणाने लिहितात-"सामान्यत: राजकीय परिस्थितीचे चित्रण दोन प्रकारे कादंबरीत येते. काही कादंबऱ्यातून राजकीय घटना त्यातील व्यक्तींच्या जीवनयात्रेत पार्श्वभूमीसारख्या येतात. लेखकाला चित्रित करायचे असतात काही व्यक्तीचे सुख-दु:खमय अनुभव. अशा व्यक्तिंचा जीवनप्रवाह काही वेळा राजकीय घडामोडीशी एकरुप होतो, पण पूर्णपणे ही एकरुपता टिकत नाही. तसेच त्यांची जीवनविषयक श्रेयस्करतेची कल्पना राजकीय आकांक्षापेक्षा अगदी वेगळया स्वरुपाची असते. अशा व्यक्तींच्या जीवनात राजकीय घटना थोडा काळा काही गती, काळी वळणे येऊन जातात. पण मग त्यांचा जीवनप्रवाह वैयक्तिक कल्पनांना भावनांनी व विचारांनीच भरुन वाहत जातो अशा व्यक्तींना राजकीय घटनांच्या उलाढालीत तुरुंगात जावे लागते वा मृत्यूमुखी पडावे लागते." डॉ.बांदिवडेकर यांनी कादंबरीतून साकारणारे राजकीय जीवन निव्वळ राजकीय जीवनाच्याच रुपाने साकार होत नसून ते मानवी जीवनातील विविध घटना-प्रसंगांच्या रुपाने अविष्कृत होऊन कशा पध्दतीने संपते ते अतिशय नेमकेपणाने मांडले आहे.

'रथचक्र' ही कादंबरी एक कुटुंबकथा होऊन साकारते. श्री.ना.पेंडसे यांनी भारतीय समाजजीवनातील अभागी आणि दुर्देवी स्त्रीच्या जीवनाची काहणी प्रस्तुत कादंबरीतून कथन केली आहे. सामान्य व्यक्तीच्या सुख-दु:खातून, संघर्षातून, जयपराजयातून जीवनाचं रुप प्रस्तुत करणं हा पेंडसेचा स्थायीभाव. एकत्र कुटुंबात जीवन जगत अतसपना एखाद्या स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या दु:खाची जेवढी म्हणून मुळं असतात त्याचा परिपूर्ण प्रत्यय पेंडसेंच्या 'रथचक्र' म्हणून येतो. 'रथचक्र' कादंबरीत राजकीय जीवनाचे चित्रण आढळत नाही. ही एक कौटुंगिक जीवनाला साकारणारी कादंबरी असल्याने राजकीय जीवनापासून या कादंबरीने फारकत घेतल्याचे दिसून येते.

'स्वामी' ही रणजीत देसाई यांची माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरी होय. रणजित देसाई यांनी आपल्या समकालीन कादंबरीकात आपल्या लेखनशैलीने आपले वेगळेपण सिध्द केले आहे. ऐतिहासिक जीवनाला प्राधान्याने साकारणारी प्रस्तुत कादंबरी इतिहास काळातील राजकीय जीवनांगाना प्रभावीपणे चित्रीत करते. माधवराव पेशव्यांनी आपल्या जीवनात आपले राज्य आणि आपली माणसं एकसंघ करुन आपल्या राजकीय जीवनात माधवरावांनी आपल्या राजकीय वाटचालीची कशी शिस्त ठेवली होते. याविषयी भाष्य करताना डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, " माधवराव पेशव्यांनी अस्ताव्यस्त झालेल्या विखुरलेल्या राज्यात अवघ्या अकरा वर्षात काहीशी एकसंघता निर्माण केली. शिवाजीराजे यांच्याप्रमाणेच माधवरावांना हे दिव्य वयाच्या सोळाव्या वर्षापासून करावे लागले. बालपण आणि तारुण्याची जेमतेम ८/१० वर्षे त्यांना या यज्ञात आहुतीसारखी टाकावी लागली. अतिशय सुंदर आणि तरुण रमासारख्या पत्नीलाही याची झळ प्रारंभापासून अखेरपर्यंत सोसावी लागली आणि रमाने तर पेशव्यांचीपरंपरा नसतानाही सती जाऊन समर्पणाची, त्यागाची, बलीदानाची, उत्तुंग झेप घेतली. हा सर्व प्रसंगच करुण आणि उदात्त भाव जागवणारा आहे आणि लेखकाचे महत्वाचे वैशिष्टये हे की या दोन्ही भवांची भव्योदात्त कथा लेखकाने तितक्याच उत्कटतेने आणि हळुवारपणे साकार केली आहे." डॉ.बांदिवडेकर यांनी ऐतिहासिक काळात आपल्या राज्यासाठी आत्मसमर्पण करुन कशापध्दतीने राजकीय कारकीर्द सांभाळली होते ते नेमकेपणाने सांगितले आहे.

मराठी कथेच्या विश्वात एक वेगळी वहिवाट निर्माण करणारे प्रभावशाली आणि प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व म्हणजे जी.ए. कुलकर्णी होय. जी.ए. यांनी आपल्या अनुभवांच्या तुकडयांनी एकत्रित करुन निर्माण केलेल्या कथा मराठी कथेच्या कक्षा रुंदाविण्यास फलदायी ठरलेल्या आहेत. मानवी जीवनातील वास्तविकतेला साकार करणारा जी.ए.यांचा 'काजळमाया' हा कथासंग्रह अधिक वैशिष्टयपूर्ण आहे. जी.ए.यांनी कोणताही साहित्यिक उद्देश सामोरा ठेवून आपण लिहिले नाही अशी कबुलीही दिली आहे. आपल्या लेखनाचे प्रयोजन स्पष्ट करताना ते सांगतात, "मी कुठल्याही साहित्यिक उद्देशाला समोर ठेवून लिहित नाही. माझ्या आयुष्याच्या कोडयाच्या सोडवणुकीसाठी एखादं व्यवहार्य उत्तर शोधण्याचा माझ्या परीनं केलेला प्रयत्न." आपल्या लेखनाविषयीची प्रामाणिक भूमिका जी.ए.यांनी या ठिकाणी अतिशय नेमकेपणने सिध्द केली आहे.

'झाडाझडती' ही कादंबरी काही राजकीय कादंबरी नाही. धरणग्रस्तांची समस्या या कादंबरीचा मुख्य विषय आहे. राजकीय जीवनाचे चित्रण येते ते धरणग्रस्तांच्या निमित्ताने धरण बांधून शेतीच्यापाण्याचा प्रश्न मार्गी लावायचा हा शासनाचा मुख्य उद्देश असतो. परंतू धरणग्रस्तांच्या जीवनाच्या प्रश्नासंदर्भात राजकारण खेळले जाते याचे वर्णन किंवा राजकीय जीवनासंबंधीचा वृत्तांत या कादंबरीतील राजकीय जीवनाच्या वृत्ती प्रवृत्तीचा एक भाग आहे.

मानवी जीवनाशी अतिशय जवळचे नाते सांगणारी नामदेव कांबळे यांची 'राघवेळ' ही कादंबरी मराठी साहित्याच्या क्षेत्रात मोठी भर घालणारी आधुनिक काळाची एक यशस्वी कादंबरी आहे. माणसाच्या जगण्याची एक पध्दत या कादंबरीच्या स्वरुपात दिसून येते. मांग समाजाला केंद्रस्थांनी ठेवून लेखक एक संपूर्ण गाव आणि गावाचे सामूहिक जीवन उभे करण्याचा प्रयत्न कांबळे यांनी या कादंबरीतून केला आहे. राजकारण

हा राघववेळचा विषय नाही. राजकीय जीवनाच्या चित्रणापासून या कादंबरीने फराकत घेतल्याचे दिसून येते. राजकीय जीवनाचे चित्रण कादंबरीत कोठेच येत नाही. 'राघववेळ' ही कादंबरी 'वालंबी' नावाच्या मातंग स्त्रीच्या जिद्दीची काहणी आहे.

रंगनाथ पठारे यांनी भारतीय राजकीय जीवनावर अतिशय मार्मिकतेने भाष्य केले आहे. 'ताम्रपट' ही कादंबरी भारतीय राजकीय जीवनाचे आणि या राजकारणातील विविध वृत्ती-प्रवृत्तीचे अतिशय भेदक आणि सडेतोड वर्णन करणारी एक प्रतिथयश कादंबरी आहे. प्रस्तुत कादंबरी १९४२ ते १९७९ या काळातील महाराष्ट्रच्या सामाजिक व राजकीय धडामोडींना आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न करणारी ही कादंबरी यशस्वतेच्या शिखरावर विराजमान झाली ती तिच्यातील आशयावरुन. इ.स.१९७५ नंतरचे बदलते समाजकारण, अर्थकारण, राजकारण, सांस्कृतिक घडामोडीतील वर्चस्ववाद, निरनिराळया व्यवस्थांतील सत्तासंघर्ष आणि यांच्या दबावाखाली जगणारी आजची पिढी हा पठारे यांच्या चिंतनाचा विषय आहे. हाच संदर्भ त्यांच्या कादंबरीतील विविध कथासूत्रातून व्यक्त होत राहतो.

राजन गवस यांनी आपल्या कादंबरी लेखनाने मराठी साहित्यविश्वाच्या दृष्टिआड गेलेल्या मानवी जीवनाला अतिश संवेदनशीलतेतून आणि वास्तवपूर्णतेने चित्रित केले आहे. मानवी समाज जीवनातील विविधांगांनी स्पर्श करुन राजन गवस यांनी एका वेगळया जीवनाचे दर्शन आपल्या लेखनातून घडविले आहे. मानवी जीवनाशी एकनिश्ठता सिध्द करणारे गवस यांचे साहित्यलेखन म्हणून आज वर्तमान स्थितीतही तेवढयाच नेटाने आणि जोमाने आपले स्थान निश्चित करुन उभे आहे. 'तणकट' ही राजन गवस यांची सन १९९८ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी स्वातंत्र्य मिळाल्यापासून चाळीस पंचेचाळीस वर्षात ग्रामीण समाज वास्तव बाहयत: विशिष्ट दिशेने बदललेले दिसते. या बदललेल्या, वब्हंशी शांत, स्थिर जीवनात काही कारणांनी पुन्हा जे संघर्ष निर्माण होतात त्यांचा अनेकांगी वेध घेते.

दुसऱ्या महायुध्दाने उग्ररुप धारण केलेले असता अशा परिस्थितीत भारतातील राष्ट्रसंतांची चळवळ उभी राहिली. यात सादूखेड संस्थानचे राजे रघुविरसिंही याला पाठींबा देतात. परकीय सत्ता आणि हिंदूस्थानी राष्ट्रनेते यांच्यातील संघर्ष या कादंबरीत पहायला मिळतो. या कादंबरीत राजकीय जीवनचित्रणाच्या दोन बाजू पहावयास मिळतात. एक जागतिक राजकीय जीवन चित्रणाचे संदर्भ आणि दुसरी बाजू राजे रघुवीरसिंहाची राजसत्ता होय. सत्य, नयायी, राजवटीला राजाच्या घरातून सुरुंग लागतो. 'राणी दयमंती राजाच्या कारभारात ढवळाढवळ करतात. आपल्यापोरी संतती होणार नाही हे कळल्यावर दमयंती राजावर सतत सुड उगवण्याचा प्रयत्न करतात. अशा आत्मघाती घरण्यांतर्गत घडणाऱ्या राजकीय संघर्षाचे स्वरुपही प्रस्तुत कादंबरीत पहावसयास मिळते. अशा द्वेषी राजकीय जीवन चित्रणाचा भाग या कादंबरीच्या यशस्वीतेतील एक महत्वाचा भाग आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये.

आजच्या वर्तमान आधुनिक जीवनाला अतिशय वास्तविकतेतून आपल्या कादंबरीत रेखाटणारे एक महत्वाचे कादंबरीकार म्हणून सदानंद देशमुख यांचे नांव अग्रक्रमाने घेतले जाते. ग्रामीण समाजजीवनात घडणाऱ्या बदलाला आणि त्यांच्या परिणामाला शब्दबध्द करणारे सदानंद देशमुख आजच्या तरुण पिढीच्या मानसिकतेचाही ठाव घेतात. ग्रामीण समाजात झालेला आमुलाग्र बदल त्यांच्याच मुळावर कसा आघात करतो ते देशमुखांच्या 'बारोमास' कादंबरीतून प्रत्ययकारीतेने पहावयास मिळते. 'बारामास' कादंबरी ग्रामीण समाजातील शेतकरी जीवनाला आणि त्यांच्या अनुषंगाने येणाऱ्या जीवनाच्या विविधागांना प्रकाशात आणते. सामाजिक जीवनाला अधोरेखित करणारी ही कादंबरी धार्मिक, आर्थिक, राजकीय जीवनातील विविध घटक ही निदर्शनास आणते. बारोमासचे मुख्य आशयसूत्र शेतकऱ्यांच्या जीवनाची दुर्दशा आणि शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलाचा बेकारीचा दारिद्रयाचा प्रश्न घेऊन साकारणारे आहे. गांधीजींच्या विचारांनी ग्रामीण समाजजीवनात आमुलाग्र बदल झाला. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. ग्रामीण तरुण शिक्षणाने सुधारला परंतू स्वार्थी आणि अपमतलबी, धोरणी मनोवृत्तीच्या संस्थाचालकांनी, राज्यकर्त्यांनी डोनेशनची अट घालून शेतकऱ्यांच्या मुलांना नोकऱ्यापासून वंचित ठेवले. अशा कुटील राजकीय मनोवृत्तीच्या डावपेचात अडकलेले तरुण बेकार झाले. एक तर नैसर्गिक आपत्तीच्या फेऱ्यात अडकलेले हे गरीब बिचारे शेतकरी आणित्यांच्या जाचात भर घालणारे हे राज्यकर्ते अशा दुर्देवाच्या फेऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनाची कशी दैना करतात याचे नेमके चित्रण प्रस्तुत कादंबरीत सदानंद देशमुख यांनी रेखाटले आहे.

सारांश :

सरतेशेवटी सारांश रुपाने सांगता येते की, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यातून साकारणारे राजकीय जीवन चित्रणवेगवेगळया कालखंडातील राजकीय मनोवृत्तील प्रामुख्याने कसे रेखाटते ते पहावयास मिळते. लेखकांनी आपल्या समकालीन राजकीय जीवनाला अतिश यजवळून अनुभवलेले असल्यानेच त्या राजकीय जीवनाचे प्रतिबिंब प्रातिनिधिक स्वरुपात त्यांच्या लेखनातून पडल्याचे पहावयास मिळते.

साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त केलेल्या विविध साहित्यकृतींचा अभ्यास करताना त्या साहित्यकृती ज्या ज्या काळात निर्माण झाल्या त्या काळाला त्यांनी आपले बरोबरीने प्रवाही ठेवत मानवी समाजजीवनात होणाऱ्या बदलांना अधोरेखित करत. तसेच जागतिक पातळीवर घडणाऱ्या राजकीय घटनांच्या परिणामांना सापेक्षित करुन या साहित्यकृती राजकीय जीवनाचे विविधांगी दर्शन कसे घडवतात ते पहावयास मिळते. राजकारण हा मानवी जीवनाच्या सर्वच अंगांना व्यापणारा आणि त्यांच्यावर मुलगामी परिणाम करणारा असा घटक आहे. माणसाच्या जगण्यातल्या साऱ्याच बाबींचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष असा संबंध राजकारणापाशी येऊन पोचतो. या ना त्या सामान्यातल्या सामान्य माणसालासुध्दा कळत नकळत राजकीय बाबींचे परिणाम भोगावे लागातत. ज्या समाजात आपण जगतो ; त्या समाजाचे हितसंबंध ज्या वेगवेगळया घटकांवर

अवलंबून असतात, त्याचे नियंत्रण ठेवणारी कोणतीही शक्ती ज्या प्रमाणात मुल्यवत्ता धारण करते, त्या प्रमाणात समाजाच्या उन्नयनाच्या शक्यता सिध्द होत जातात. म्हणूनच आपण असे मानले पाहिजे की, राजकारण हा अंतिमत: व्यक्तित्च्या आणि समाजाच्या उन्नत अवस्थेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणारा एक घटक आहे आणि म्हणूनच राजकारण हे मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंग बनते. ते कसे हे या अकादमी पुस्कार प्राप्त साहित्य कृतीच्याद्वारे पहावयास मिळते.

निष्कर्ष

कथात्मक कलाकृतीतून साकारलेल्या राजकीय जीवन चित्रणाचा विविधांगी विचार मांडला आहे हे राजकीय जीवन चित्रण त्या कलाकृतीच्या सौंदर्यात तसेच गुणात्मकतेत कसे महत्वपूर्ण आहे ते विचारात घेतले आहे. मानवी समाजात राजकारणाला विशेष महत्व असून समाजातील प्रत्येक माणूस राजकारणाशी प्रत्यक्षअप्रत्यक्ष रित्या कसा बांधला गेलेला असतो ते स्पष्ट होते. तसेच प्रत्येक समाजात राजकारणाला कशी वेगवेगळी अंगे प्राप्त होतात, ते स्पष्ट होते. या प्रकरणातील निष्कर्ष खालील प्रमाणे सांगता येतील.

- समाजातील राजकीय परिस्थिती, राजकारण, विविध राजकीय पक्ष, त्यांचा समाजमनांवर असणारा पगडा, राजकारणावर विविध नेत्यांचा असणारा ठसा, त्यांचे साहित्यातून पडलेले याचे प्रत्ययकारी चित्र कलाकृतीस उठावदारपणा निर्माण करते.
- राजकीय कुरघोडील बळी पडलेल्या समाजाची होणारी वाताहत राजकारणातल्या वेगवेगळया मनोवृत्ती समाजाला कशा पोखरत आहेत याचा प्रत्यय येतो.
- राजकीय जीवनात घडणाऱ्या घटना, घडामोडी, सामाजिक जीवनावर कसा प्रभाव टाकतात ते भारत-पाक फाळणी, चीनचे भारतावर आक्रमण या चित्रणातून स्पष्ट होते.
- पुरस्कार प्रापत कथात्मक साहित्यकृतीतून साकारणाऱ्या या जीवनाला या राजकीय जीवनचित्रणाने कसे पूर्णत्व प्राप्त होते ते स्पष्ट होते. शिवय हे राजकीय जीवनचित्रण कलाकृतीच्या गुणात्मकेते कसे महत्वाचे ठरते आणि कलाकृतीला पुरस्कारास सिध्द करते ते स्पष्ट होते.

संदर्भ

१. डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आ.ऑ.१९९६, पृ.६३.
२. तत्रैव, पृ.क्र.६५.
३. डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, उ.नि.पृ.क्र.१२०.
४. प्रा.श्री.मा.कुलकर्णी, स्वामी एक शोध, संपा.डॉ.मीरा घांडगे,मेहता पब्लिकशिंग हाऊस, पुणे, पृ.क्र.६० व ६१
५. रणजित देसाई, स्वामी, मेहता पब्लिकशिंग हाऊस, पुणे, सत्ताविसावी आवृत्ती मार्च २००८, पृ.क्र.२९.
६. अज्ञात, तत्रैव पृ.३०.
७. संजीवनी खेर, 'जीए च्या रमल आठवणीचे पारवे भेटले तेव्हा', (या लेखातील सुलोचना कित्तुर यांना जी.ए.नी, पाठविलेले पत्र) लोकप्रभा, १८-१२-१९८८ पृ.क्र.२९.
८. सदाशिव त्र्यंबक कुल्ली, जीए : जीवनदृष्टी आणि प्रतिमा सृष्टी, पृ.क्र.२४.
९. डॉ.यशोद श्रीमंतराव पाटील, ग्रंथवेध, साहित्य अकादमी पुस्कार प्राप्त ग्रंथ, संपा.प्रा.डॉ.भास्कर शेळके, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.२०१२ पृ.१०४.
१०. गो.नी.दांडेकर, स्मरणगाथा, मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई, प.आ.८ जुलै १९७३ पृ.क्र.८२.